लोकमत




देवरुख येथील मातृमंदिर संस्थेला फिनोलेक्स इंडस्ट्रीज आणि मुकुल माधव फाऊंडेशनतर्फे ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर देण्यात आले. यावेळी आमदार शेखर निकम, मातृमंदिर ट्रस्टचे अभिजीत हेगशेट्ये यांच्यासह कंपनीचे पदाधिकारी उपस्थित होते.

# मातृमंदिर संस्थेला कॉन्सन्ट्रेटर मदत

## फिनोलेक्स इंडस्ट्रीज, मुकुल माधव फाऊंडेशनचा उपक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

**रत्नागिरी :** फिनोलेक्स इंडस्ट्रीज आणि मुकुल माधव फाऊंडेशनने एक पाऊल पुढे टाकत देवरुख मातृमंदिर संस्थेला ५ ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर (१० लीटर प्रति मिनिट ऑपरेटिंग लोड) देणगी स्वरूपात देण्यात आले. सामाजिक बांधिलक

सध्या देशभरात कोविड १९ रुग्णांची वाढती संख्या लक्षात घेऊन त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी गावागावात कोविड सेंटर सुरू करण्यात आली आहेत. याचाच एक भाग म्हणून चिपळूणचे आमदार शेखर निकम यांनी फिनोलेक्स इंडस्ट्रीज आणि मुकुल माधव फाऊंडेशनकडे देवरुख मातृमंदिर संस्थेला वैद्यकीय उपकरणांची मागणी केली होती. ही

- कोरोनाच्या काळात मदतीचा हात देण्यात येत आहे.
- सामाजिक बांधिलकी जपत हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे.
- मातृमंदिर संस्थेकडून ३० बेडचे कोविड केअर सेंटर सुरू.

मागणी मुकुल माधव फाऊंडेशनच्या विश्वस्थ रितू प्रकाश छाब्रिया यांनी लगेचच मान्य करून २८ मे रोजी देवरुख मातृमंदिर कोविड सेंटर यांच्याकडे ५ ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर दिले. हे कॉन्सन्ट्रेटर संस्थेच्या ताब्यात देण्यात आले आहेत.

या कार्यक्रमाला आमदार शेखर निकम, मातृमंदिर ट्रस्टचे सदस्य अभिजीत हेगशेट्ये, तहसीलदार थोरात, गटविकास अधिकारी रेवणकर, मुख्य कार्यकारी अधिकारी नगरपरिषद बालाजी लोंडे, मातृमंदिराचे विश्वस्त व फिनोलेक्स व मुकुल माधव फाऊंडेशनचे पदाधिकारी उपस्थित होते.

मातृमंदिरने जवळपासच्या खेड्यांसाठी कमी खर्चात ३० बेडसाठी कोविड केअर सेंटर सुरू केले आहे. याचा आजूबाजूच्या गावांना चांगला फायदा होत आहे. संस्थेने सुरू केलेल्या या कोविड सेंटरला हातभार लागावा, यासाठी फिनोलेक्स इंडस्ट्रीज आणि मुकुल माधव फाऊंडेशनने मदतीचा हात दिला आहे. आमदार शेखर निकम आणि अभिजित हेगशेट्ये यांनी फिनोलेक्स इंडस्ट्रीज आणि मुकुल माधव फाऊंडेशनचे आभार मानले.